
स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
वास्तवी १९ वर्ष
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

फक्त वीस रुपयात


Cont : 9049594101 9022952922

**आवाहन**



उष्माघाता पासून सांभाळा...

**उष्माघात टाळण्यासाठी काही महत्तवाच्या गोष्टी लक्षात ठेवा**

**भरपूर पाणी प्या**

● उन्हाळ्यात घामाचे प्रमाण अधिक येत असल्यामुळे शरीराला पाण्याची अधिक गरज असते, त्यामुळे नियमित माठामधिल पाणी पीत राहा.

**हलके कपडे**

● शक्यतो पांढरे सुती आणि हलक्या रंगाचे कपडे घाला.

**दुपारचं ऊन टाळा**

● शक्यतो पांढरे सुती आणि हलक्या रंगाचे कपडे घाला. दुपारचं ऊन टाळा. दुपारी 12 ते 4 या वेळेत घराबाहेर पडणं टाळा. प्रवास करताना उजव्या काना मध्ये कापूस ठेवून प्रवास करावा. डोक्यावर पांढरी टोपी घालून त्यात कादा ठेवा.

**फ्रिजच पाणी व पदार्थांचं सेवन टाळा**

● त्याऐवजी ताक, लिंबू + मध + पाणी, आंब्याचं पण, चिंच + गुळ याचे सरबत, फळांचे रस, बेलफळ सरसत, कलिंगड, काकडी यांसारखे थंड पदार्थ खा.

**पुरेशी विश्रांती**

● उन्हाळ्यात जास्त शारीरिक कामं करणं टाळा. तुम्ही या गोष्टींची काळजी घेतल्यास, उष्माघातापासून बचाव होईल

सांज दैनिक बीड वास्तव जनहितार्थ प्रकाशित

# जॉन्सन साहेब बीडचे पुढारीच जिल्हा प्रशासन चालवतात आता यापुढे तुम्ही चालवा!!

## पुढाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे त्यांचे फावले मात्र सर्वसामान्य जनता आजही मूलभूत सुविधांपासून दूर!

## जॉन्सन साहेब अधिकारी, कर्मचाऱ्यांचे खांदेपालट करा अन्यथा तुमचीही स्वच्छ प्रतिमा मलीन होईल!!

## महसूल, गौण खनिज विभागातील अधिकारी तर मालकाप्रमाणे वागू लागले, जनतेचे सेवक म्हणून नाही!

**जिल्हा प्रशासनातील पुढाऱ्यांचा नको तेवढा हस्तक्षेप यापुढे होता कामा नये, अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**



बीड : जर पुढारीच जिल्हा प्रशासन चालणार असतील तर अधिकारी आणि कर्मचारी कशाला हवेत? पुढाऱ्यांच्या नको तेवढ्या हस्तक्षेपामुळे सर्वसामान्य जनतेची कामे मात्र खोळंबून पडली आहेत. काही भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरायचे आणि पुढाऱ्यांनी आपली स्वत:ची कामे करून घ्यायची, यामुळे पुढाऱ्यांचे फावते मात्र सर्वसामान्य जनतेची कामे आजही तशीच पडून आहेत. शिवाय देणं घेणं केल्याशिवाय सर्वसामान्य जनतेची कामे होतच नाहीत हा आजवरचा सर्वसामान्य जनतेचा अनुभव आहे. तेव्हा नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन बीडकरांच्या या कटू अनुभवाला छेद देण्याचे काम करतील का? असाही सवाल सर्वसामान्य जनतेमधून व्यक्त केला जात आहे. एकूणच जिल्हा प्रशासनातील पुढाऱ्यांचा नको तेवढा हस्तक्षेप यापुढे होता कामा नये, अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अधिकाऱ्यांचा सत्कार करणे, त्यांनी सत्कार स्वीकारणे दोन्ही गैर : ॲड. अजित देशमुख



जनता नवीन आलेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार करते. प्रतिनिधिक स्वरूपात एखादा दुसरा सत्कार होण्यास हरकत नाही. मात्र शेकडो सत्कार करणं आणि शेकडो सत्कार स्वीकारणे, हे चुकीच आहे. जनतेने आपले काम करावे आणि अधिकाऱ्यांनी आपले काम करावे, हा नियम आहे. त्यामुळे सत्कार स्वीकारणे चूक आहे तर दुसरीकडे सत्कार कोण करते, यालाही महत्त्व आहे. अलीकडच्या काळात मोठे अधिकारी आणि मोठ्या पुढाऱ्यांसोबतचे फोटो प्रकाशित झाल्यानंतर जनतेने यावर चिंतन केले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचा तुम्ही देखील सत्कार करू नका, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे. अनेक जण सत्कार करतात. अनेकांचे सत्कार ते काय उद्योगधंदे करतात, हे माहीत असतानाही जाणीवपूर्वक स्वीकारले जातात. त्याचा समाजावर वेगळा प्रभाव पडत असतो. आम्ही प्रशासना बरोबर आहेत. प्रशासन आम्ही सांगतो ते ऐकत, अशा पद्धतीचा निरोप सत्काराच्या आणि गप्पागोष्टींच्या माध्यमातून ते समाजापर्यंत पोहोचवत असतात. सत्कार करणारे सर्वच गैर आहेत, असे नाही. चांगले लोक देखील आहेत. पण सगळ्यांनी आपल्या भावनांना आवर घालून आपले काम करायला हवे.

### महसूल आणि गौण खनिज विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे खांदेपालट करा!

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल आणि गौण खनिज विभाग सुता सारखा सरळ करण्याची गरज आहे. विभागातील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जनतेचे सेवक नाही तर मालक झाल्यासारखे वाटत आहे. विशेष म्हणजे त्यांना हे विभाग म्हणजे त्यांच्या बापाची जहागिरी असल्यासारखे सर्वसामान्य जनतेशी वागत आहेत. अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची या विभागातून उचल बांगडी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या विभागामुळे जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलिन होत चालली आहे. तेव्हा ही प्रतिमा उंचावण्यासाठी नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना प्रयत्न करावे लागणार आहेत, अशाही भावना व्यक्त केल्या जात आहेत.

### सत्कारासाठी बुके नको बुक आणा हि बाब अधिकाऱ्यांमध्ये रुजली पाहिजे!

● नुकतेच बिरूदेव यांनी आय.ए.एस. परीक्षा पास झाल्यानंतर मित्रमंडळी आणि जनतेला आवाहन केले की, त्यांनी सत्कारासाठी बुके आणू नये. बुक आणावे. ही बाब अधिकाऱ्यांनी लक्षात घेतली पाहिजे. आपल्या सत्कारासाठी कोण आले, त्यांचे धंदे काय आणि त्याच बरोबर त्यांनी आजपर्यंत काही गैरव्यवहार केलेला आहे का? याची चाचपणी संबंधित अधिकाऱ्याने नंतर केली पाहिजे. त्या गैर कारभारावर आळा घातला पाहिजे. मात्र असे होत नाही. बीड जिल्ह्यातील प्रशासन जनतेसाठीचे राहिलेले नाही, हे अनेक वेळा दिसून येते. पुढारी आणि अधिकारी यांचे संगणमत झाल्याने अनेक मोठमोठे घोटाळे बीड जिल्ह्यात झालेले आहेत. आमच्यामुळे अनेक घोटाळ्यात कारवाई झाली. अनेक घोटाळे आम्ही हाणून पाडले. नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या संदर्भातली माहिती घेतली पाहिजे, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

### ते साध्या कपडेवाल्यांना नाही तर पांढरे शुभ्र कपडे असलेल्यांसाठी उठून सत्कार घेतात!

● आमच्या बोलण्याचा अनेकांना राग येईल. मात्र आम्ही सार्वजनिक रित्या सर्वांना बोलत नाहीत. तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनेक लोकांनी सत्काराच्या माध्यमातून अनेकांना फसवल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अशा गुन्हेगारांना अधिकाऱ्यांनी रोखले पाहिजे. म्हणून आम्ही या विषयावर बोलत आहोत. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, अधिकारी सामान्य माणूस म्हणजेच साधारण कपडे घालून आलेला माणूस सत्कारासाठी आल्यानंतर उठत नाहीत. पांढरे शुभ्र कपडे असलेल्या माणसांसाठी ते उठून सत्कारासाठी सज्ज होतात. हा देखील सामान्य जनतेच्या मनावर आघात करणारा एक प्रश्न आहे. त्यामुळे सामान्य जनतेने देखील सत्काराला जाण्याची आवश्यकता नाही.

## पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा गाय वासरूची मूर्ती देऊन सत्कार





मुंबई : येथे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या मुंबई येथील जनता दरबार कार्यक्रमात खात्यासंबंधी चर्चा करून गाय वासरूची मूर्ती देऊन सत्कार केला. यावेळी व्यासपीठावर भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख उपस्थित होते. पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करताना माजी आमदार नारायणराव मुंडे यांचे चिरंजीव सुघोष भैय्या मुंडे, भाजपाचे महामंत्री नोटरी ॲड. राहुलकुमार राका, भाजयुमो प्रदेश सचिव दत्तप्रसाद जाधव व परमेश्वर महाराज वाघमोडे आदी.

## मलकापूर येथे जनसेवानंद सुभाषबप्पा महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताह

### ५ मे ते १२ मे दरम्यान बहुसंख्येने उपस्थित राहावे -एकनाथ महाराज लोमटे

**गेवराई : प्रतिनिधी**

जनसेवेसाठी ज्यांनी आपले जीवन समर्पित केले ते कलियुगातील महान संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष बप्पा महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ मलकापूर येथे दि.५ मे २०२५ ते दि.११ मे २०२५ दरम्यान भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सप्ताहास भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीक्षेत्र दत्त मंदिर संस्थान, मलकापूरचे मठाधिपती ह.भ.प. सद्‌गुरू एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.



कलियुगातील महान थोर संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ श्रीक्षेत्र मलकापूर, ता.कळंब जि.धाराशिव येथे भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री सिद्ध सुभाष बप्पा विजय ग्रंथ पारायण व गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे दि.५ मे २०२५ ते दि.११ मे २०२५ या कालावधी दरम्यान आयोजन करण्यात आले असून या भव्य दिव्य सप्ताहात एक हजार टाळकरी, २२ मृदंगाचार्य या सप्ताहाचे आकर्षण असणार आहेत. तसेच या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ७ काकडा भजन, ७ ते १० सिद्ध सुभाष बप्पा विजय ग्रंथ पारायण, १० ते १२ गाथा भजन, ● पान २ वर...

## पेहलगाम हल्ल्यातील शहीद कुटूंबियांच्या दु:खावर मायेची फुंकर



पेहलगाम : दि.२५ एप्रिल २०२५ रोजी राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार पेहलगाम हल्ल्यात शहीद झालेले आदिल हुसेन शहा यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी उपमुख्यमंत्री कार्यालयातील काही अधिकारी आणि युवासेनेचे निरीक्षक बाजीराव चव्हाण अनंतनाग जिल्ह्यातील हापतनाड गावात शहीद आदिल हुसेन शहा यांच्या कुटुंबियांचं सांत्वन करण्यासाठी पोहचले आणि शिवसेनेकडून या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. त्याचबरोबर आदिल हुसेन यांचं जीर्ण अवस्थेतील घर बांधून देण्याची जबाबदारी ही राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी घेतली आणि या घराच्या बांधकाम करण्याची जबाबदारी ही युवासेनेचे निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्यावर दिली आहे.

**साक्षी कांबळे कुटुंब... ➤ .....आज पुन्हा चौकशीला बोलावले**

# 2 मुलींच्या आत्महत्येचा दावा, पण जबाबतही दिली नाही माहिती

**बीड : प्रतिनिधी**

ब्लॅकमेलिंग, छेडछाडीला कंटाळून शहरातील साक्षी कांबळे या विद्यार्थिनीने धाराशिवमध्ये केलेल्या आत्महत्येनंतर तिच्या आईने अन्य दोन मुलींनीही अशाच प्रकारे आत्महत्या केल्याचा दावा केला होता. मात्र, गुरुवारी कळंबचे डीवायएसपी संजय पवार यांनी नोंदवलेल्या जबाबातही त्यांनी या दोन मुली कोण याची माहिती पोलिसांना दिलेली नाही.



बीड येथील एका महाविद्यालयील साक्षी कांबळे या विद्यार्थिनीला अभिषेक कदम नावाचा तरुण हा छेड काढून त्रास देत होता. या मुलीचा साखरपुडा होऊन २० एप्रिलरोजी विवाह होणार होता. मात्र अभिषेक हातिला ब्लॅकमेल करत होता. याला कंटाळून तिने २४ मार्च रोजी धाराशिवमध्ये मामाच्या घरी आत्महत्या केली होती. या प्रकरणी गुन्हा नोंद होऊन अभिषेकला अटक झाली होती. त्याला जामीनही मिळाला होता. यानंतर मुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून न्यायाची मागणी केली होती. उपसभापती निलम गोऱ्हे यांनीही या मुलीची भेट घेतली होती. यावेळी मुलीच्या आईने अन्य दोन मुलींनी आत्महत्या केल्याचा दावा केला होता तर तपास अधिकारी स्वप्निल राठोड यांच्यावरही आरोप केले होते. त्यानंतर तपास अधिकारी बदलून हा तपास कळंबचे डीवायएसपी संजय पवार यांच्याकडे दिला गेला. पवार यांनी गुरुवारी साक्षीच्या आईसह ४ जणांचे जबाब नोंदवले. मात्र, यातही त्यांनी त्या दोन मुलीची नावे सांगितली नाहीत.

### जामीन रद्द करण्याचा अर्ज

● दरम्यान, साक्षीचे कुटुंब हे अभिषेक कदमयाला मिळालेला जामीन रद्द करण्यात यावा यासाठी धाराशिव न्यायालयात अर्ज करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शुक्रवारी यासाठी ते न्यायालयात गेले होते. तर शनिवारी डीवायएसपींनी त्यांना पुन्हा चौकशीसाठी बोलावले आहे.

पाहिजेत
Mahindra TRACTORS
आमच्या येथील सुसज्ज महिंद्रा ट्रॅक्टर्स च्या शोरुम साठी खालील जागा भरावयाच्या आहेत.

सेल्समन- ४ जागा
माजलगाव व गेवराई तालुक्यासाठी
पदवीधर, ट्रॅक्टर विक्रीचा किंवा ऑटोमोबाईल क्षेत्रातील सेल्समनशिप कमीत कमी २ वर्षाचा अनुभव, स्वत:ची टू व्हीलर असणे आवश्यक आहे.
वरील तालुक्याचे रहिवासी असल्यास अधिक प्राधान्य.
गरजू व होतकरू उमेदवारांनी ८ दिवसात आपला अर्ज वैयक्तकि खालील पत्त्यावर आणून द्यावेत.
पात्र उमेदवारास आकर्षक पगार व इन्सेन्टीव्ह दिला जाईल.
अर्ज खालील पत्यावर देणे
सुमित्रा मोटर्स गेवराई मो.8149121255
गोविंद मोटर्स माजलगाव मो.9975059508 / 8975728996

विशेष

# आंबवलेले पदार्थ शरीरासाठी ठरतात लाभदायक, 7 गुणकारी फायदे!





फॉर्मटेड फूड म्हणजेच आंबवलेले पदार्थ. इडली, डोसा हे पदार्थ तयार करताना सर्वात आधी त्याचे पीठ आंबवले जाते. आंबवलेले पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. आंबवण्याच्या प्रक्रियेत बॅक्टेरिया आणि यीस्टसारखे सूक्ष्मजीव स्टार्च आणि साखर सारख्या कर्बोदकांमधे अल्कोहोल किंवा ऍसिडमध्ये रूपांतरित करतात. त्यामुळं जास्त प्रमाणात आंबवलेल्या पदार्थांची चवदेखील थोडी आंबट होते. आंबवण्याच्या प्रक्रियेत चांगले जीवाणू वाढतात. या जीवाणूंना प्रोबायोटिक असं म्हणतात. आंबवलेल्या पदार्थांचे सात फायदे जाणून घ्या.

### आंबवलेले पदार्थ कसे बनवले जातात?

◆ आंबवलेले पदार्थ बनवण्यासाठी काही पदार्थांना काही तासांसाठी रुम टेम्परेचरवर ठेवून दिले जाते. म्हणजेच जर तुम्हाला इडली किंवा डोसा बनवायचा असेल तर डाळ–तांदुळ मिक्सरमध्ये वाटून त्याचे पीठ तयार करुन ते आंबवण्यासाठी ठेवावे. अशाच प्रकारे तुम्ही ढोकण्याचे पीठदेखील तयार करु शकता. काही तास हे पीठ रुम टेम्परेचरवर ठेवल्याने त्याची आंबण्याची प्रक्रिया सुरू व्हायला लागते. पीठ आंबल्याने त्याची चवदेखील बदलते. तर, पीठ आंबत असताना ते हळूहळू फुलायला लागते. पीठ लवकर आंबवायचे असल्यास बेकिंग सोडा, यीस्ट किंवा फ्रुट सॉल्ट टाकू शकतात.

### आंबवलेल्या पदार्थांचे आरोग्यासाठी फायदे

### प्रोबायोटिक

◆ बहुतेक आंबवलेल्या पदार्थांमध्ये चांगले जीवाणून असतात. जे प्रोबायोटिक असतात. हे जीवाणू तुमच्या आतड्यातील बॅक्टेरियाचे संतुलन पुनर्संचयित करण्यास मदत करतात आणि पचनासंबंधीत सर्व समस्या दूर करतात.

### पचनास मदत करतात

◆ नैसर्गिक साखर आणि स्टार्चचे विघटन झाल्यामुळं आंबवलेले पदार्थ पचायला सोपे असतात.

◆जेव्हा आपण काही पदार्थ आंबवतो तेव्हा आपण त्यांची आरोग्य क्षमता वाढवण्यास मदत करत असतो. तुमच्या आतड्यातील बॅक्टिरीया वाढवून शरीराला बी जीवनसत्व आणि व्हिटॅमिन के तयार करण्यची क्षमता निर्माण करते.

### मूड सुधारतो

◆ आंबवलेल्या पदार्थांमुळे मानसिक ताण–तणाव आणि डिप्रेशनसारख्या समस्येंवर मात करण्यास मदत करतात.

### हृदयाचे आरोग्य सुधारते

◆ आंबवलेले पदार्थ हे पौष्टिक आणि संतुलित आहार आहे. या आहारामुळे हृदयविकाराच्या झटका येण्याची शक्यता कमी होते. तसंच, कोलेस्ट्रॉल बॅलेन्स आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

### रोगप्रतिकार शक्ती वाढवते

◆ आंबवलेल्या पदार्थांमुळं रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्यामुळं सर्दी, खोकला यासारखे आजार कमी होतात. व्हिटॅमिन सी, आयर्न, झिंक इत्यादी गुणधर्म आढळतात.

### वजन कमी करते

◆ अनेक संधोशनानुसार, आंबवलेल्या पदार्थामुळं वजन व पोटाचा घेर कमी होण्यास मदत होते

# शरीरातील या समस्या आहेत फुफुसाच्या संसर्गाची लक्षणे, अशी घ्या काळजी!

आता देशात कोरोनाची व्याप्ती कमी होताना दिसत आहे. मात्र, यापूर्वी हजारो लोक पुन्हा या विषाणूच्या विळख्यात आले आहेत. या वेळी कोविडची लक्षणे पूर्वीप्रमाणेच सौम्य राहिली, परंतु गंभीर आजार असलेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागले, परंतु रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर काही लोकांना श्वसनाचा त्रास होत आहे, ज्याचे कारण थेट फुफुसाच्या कमकुवतपणामुळे आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, काही प्रकरणांमध्ये कोविडची सौम्य लक्षणे दिल्यानंतरही समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

यामध्ये श्वसनमार्गाशी संबंधित समस्या अधिक दिसून येतात. कोविडमधून बरे झाल्यानंतरही तुम्हाला श्वसनाचा त्रास होत असेल, तर तुम्ही डॉक्टरांशी संपर्क साधावा. हे फुफुसातील संसर्गाचे लक्षण आहे. या बाबीकडे दुर्लक्ष केल्यास फुफुसातील समस्या वाढू शकते.

पल्मोनोलॉजिस्ट डॉ भगवान मंत्री स्पष्ट करतात की कोविड नंतर श्वासोच्छ्वासाची समस्या दिसून येते. अशी समस्या उद्भवल्यास पल्मोनरी



फंक्शन टेस्ट करता येते. या चाचणीच्या मदतीने, फुफुसात किंवा श्वसनमार्गामध्ये कोणताही संसर्ग शोधला जाऊ शकतो. कोविड दरम्यान काही रुग्णांमध्ये न्यूमोनियाच्या तक्रारी देखील दिसून येतात, ज्याचा प्रभाव बरे होईपर्यंत टिकतो.

अशा परिस्थितीत, आपल्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. जर तुम्ही दमा, सीओपीडी किंवा ब्राँकायटिसचे रुग्ण असाल, तर फुफुसांच्या आरोग्याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे. गेल्या दोन दिवसांपासून देशात कोविडचे रुग्ण कमी होत आहेत. गेल्या 24 तासांत 7 हजारांहून कमी केसेसची नोंद झाली आहे. तीन दिवसांपूर्वीपर्यंत 10 हजारांहून अधिक केसेस येत होत्या, या दृष्टिकोनातून कोविडचा आलेख आता घसरत आहे. नवीन रुग्णांसोबतच सक्रिय रुग्णांची संख्याही कमी होत आहे. सक्रिय प्रकरणांचा आकडा 65 हजारांवरून 63,380 वर आला आहे. तथापि, अनेक राज्यांमध्ये कोविडच्या नवीन प्रकरणांमध्ये रशी घट झालेली नाही. केरळमध्ये अजूनही 10,000 हून अधिक सक्रिय प्रकरणे आहेत, परंतु राज्यांचा सकारात्मकता दर खाली येऊ लागला आहे. दिल्लीतील संसर्गाचे प्रमाणही आता कमी होत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हे शिखर पार झाल्याचे लक्षण आहे, जरी काही दिवस नवीन प्रकरणांवर लक्ष ठेवावे लागेल.

# थंडीत सतत सर्दी होतेय का? सकाळी रिकाम्या पोटी प्या हे ड्रिंक!

■ थंडीचे दिवस सुरू होताच नाक गळणे, घसा खवखवणे या समस्या सुरू होतात. ऋतू बदलताच शरीरातही ते बदल होतात आणि त्यामुळे हे आजार सतावतात. मात्र नाक गळत असेल अथवा गळ्यात खवखव होत असेल तर कशात मनही लागत नाही. अशा वेळेस सकाळी चहा कॉफी पिण्याऐवजी लिंबू आणि लवंगाचे पाणा एक गरम कप प्या. यामुळे सर्दीचा त्रास दूर होण्यास मदत होते.

■ लिंबामध्ये व्हिटामिन सीचे प्रमाण अधिक असते. यामुळे इम्युनिटी वाढते. सोबतच हे प्यायल्याने घसा मोकळा होण्यास मदत होते. यामुळे कफ बाहेर पडण्यास मदत होते.

■ दुसरीकडे लवंगामध्ये सूजविरोधी आणि किटाणूविरोधी घटक असतात. यातील युजेनॉल आणि गॅलिक ॲसिड असते. जे अँटीऑक्सिडंटसारखे काम करतात.

■ लवंगामुळे खोकला कमी होण्यास मदत होते. तसेच सर्दीमध्ये श्वास घेण्यास मदत होते. यामुळे आरामात झोप लागते.




### असे बनवा ड्रिंक

■ आधी लवंग टाकून पाणी गरम करून घ्या. त्यानंतर आरामदायक तापमानावर थंड करा. पाण्यामध्ये व्हिटामिन सीचे प्रमाण कायम राखण्यासाठी थंड झाल्यावर लिंबू टाका. त्यानंतर त्याच एक चमचा मध टाका.



# एसटीच्या तिकीटांमधील सवलत महिलांना महागात पडण्याची भीती, धक्कादायक बातमी समोर

मुंबई : राज्य शासनाने महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत जाहीर केल्याने महिला प्रवासी संख्या वाढली आहे. मात्र, पुणे शहरातील स्वारगेट, शिवाजीनगर यांसारख्या प्रमुख स्थानकांवर महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चोरी, विनयभंग आणि बलात्काराच्या घटनांमुळे ही सवलत धोक्याची ठरत आहे.




### प्रवासी संख्या वाढली, सुरक्षा रामभरोसे?

महिलांना प्रवासात ५०% सवलत देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय वाढली आहे. राज्यभरात दररोज सरासरी ५० हजार महिला प्रवासी वाढले आहेत. मात्र, वाढत्या गर्दीसोबतच महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा गंभीर बनला आहे. पुणे शहरातील स्वारगेट आणि शिवाजीनगर ही स्थानके राज्यभरात आणि शहरात ये–जा करणाऱ्या बसेसमुळे कायम गर्दीने भरलेली असतात. या गर्दीचा फायदा घेत चोरटे महिलांचे मोबाईल, पर्स आणि दागिने लंपास करत आहेत. गुरुवारीच स्वारगेट स्थानकात एका महिलेचा मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडली.

### चोरीसह बलात्काराच्या घटनांनी चिंता वाढवली

केवळ चोरीच नव्हे, तर विनयभंग आणि अगदी बलात्कारासारख्या गंभीर घटनाही बसस्थानक परिसरात घडल्या आहेत. दोन महिन्यांपूर्वी तरुणीवर बलात्कार झाल्याच्या घटनेने महिलांच्या, विशेषत: एकट्या प्रवास करणाऱ्या किंवा मुलांसोबत असणाऱ्या महिलांच्या मनात भीतीचे वातावरण आहे. अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे गुन्हेगारांचे फावत आहे. स्वारगेट आगार व्यवस्थापक सचिन शिंदे यांनी स्थानकावर सुरक्षा असल्याचे म्हटले असले, तरी गर्दीचा गैरफायदा घेऊन चोऱ्या होत असल्याचे त्यांनी मान्य केले. महिलांनी महागडे दागिने घालून प्रवास करू नये, असा सल्ला त्यांनी दिला. मात्र, उपलब्ध २२ सीसीटीव्ही कॅमेरेही गर्दीच्या तुलनेत अपुरे असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### मुंबई इंडियन्सचा मोठा धमाका! 19000 मुलांना देणार 'हे' खास 'गिफ्ट'

मुंबई इंडियन्सने एक सुंदर सामाजिक उपक्रम घेतला आहे. २७ एप्रिल रोजी वानखेडे स्टेडियमवर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात, तब्बल १९,००० मुलांना मोफत लाईव्ह सामना पाहण्याची संधी दिली जाणार आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून २०० विशेष मुलांनाही सामावून घेण्यात आले आहे.

हा खास उपक्रम 'एज्युकेशन अँड स्पोर्ट्स फॉर ऑल' या प्रकल्पाअंतर्गत राबवला जात आहे, ज्याची सुरुवात नीता अंबानी यांनी २०१० साली केली होती. दरवर्षी आयपीएलच्या एका सामन्यादरम्यान हा उपक्रम आयोजित केला जातो.

मुलांना मिळणार खास अनुभव :

या सामन्यात सहभागी होणाऱ्या मुलांना त्यांच्या आवडत्या क्रिकेट स्टार्सना जवळून पाहण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. वानखेडे स्टेडियमच्या जल्लोषपूर्ण वातावरणात सामन्याचा थरार अनुभवण्याचा आनंद मुलांना पहिल्यांदाच मिळणार आहे. यासाठी रिलायन्स फाउंडेशनने विविध NGO सोबत करार केला आहे.

### भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे- ह भ .प.एकनाथ महाराज लोमटे

## जनसेवानंद सुभाष बाप्पा महाराज यांच्या सतराव्या पुण्यतिथी निमित्त सप्ताह



➤ गेवराई : प्रतिनिधी
जनसेवेसाठी ज्यांनी समर्पित केले आहे आपले जीवन ते कलियुगातील महान संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष बाप्पा महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ भव्य दिव्य सप्ताहाचे मलकापूर येथे आयोजन केले असून सप्ताहास बहुसंख्य भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ह भ प सद्गुरु एकनाथ महाराज लोमटे श्री दत्त संस्थान मलकापूर मठाधिपती यांनी केले आहे.

कलियुगातील महान संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री सिद्ध सुभाष बाप्पा विजय ग्रंथ पारायण व गुरुचरित्र पारायण याचे आयोजन दिनांक पाच 5/5/2025 ते 11/ 5/ 2025 या कालावधीत करण्यात येणार असून या भव्य दिव्य सप्ताह निमित्य, 1000 टाळकरी व 22 मृदंगाचार्य या सप्ताहाची आकर्षण राहणार आहेत तसेच या सप्ताहात सकाळी 4 ते 7 काकड भजन 7 ते 10 सिद्ध सुभाष बाप्पा विजय ग्रंथ पारायण 10 ते 12 गाथा भजन 12 ते 3 विश्रांती व 4 ते 6 हरिपाठ नेतृत्व रघुनंदन महाराज पुजारी संत गोरोबाकाका वारकरी संस्था यांच्याकडे राहील तसेच 6 ते 8 भोजन व 9 ते 11 कीर्तन असा या सप्ताहाचा दिनचर्या राहणार असून या सप्ताहात नामवंत कीर्तनकार उपस्थित राहणार आहेत दिनांक 5 मे 2025 ह भ प समाधान महाराज शर्मा दिनांक 6 मे 2025 ह भ प पोपट महाराज कासारखेडकर दिनांक 7 मे 2025 ह भ प अंकुर महाराज साखरे दिनांक 8 मे 2025 ह भ प डॉक्टर जयवंत महाराज बोधले दिनांक 9 मे 2025 ह भ प बाळू महाराज गिरगावकर दिनांक10मे 2025 ह भ प रामराव महाराज ढोक दिनांक 11 मे 2025 ह भ प महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे कीर्तन व ह भ प एकनाथ महाराज लोमटे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे तसेच दिनांक 12मे 2025 रोजी सकाळी 7 ते 9 वारीचे प्रवचन व त्यानंतर पौर्णिमेची महाआरती मलकापूर तालुका कळम जिल्हा धाराशिव येथे होईल तरी सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प सद्गुरु एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना बोगस घरकुलांची चौकशी करा : रूपचंद कर्डीले



➤ आष्टी : प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील अनेक गांवामध्ये जे गरजु लाभार्थी आहेत त्यांना घरकुल मिळाले नाहीत, ज्या लाभार्थ्यांना पक्के घरे आहेत त्याच लोकांना घरकुले आलेले आहेत व अत्यंत गरजु लाभार्थी आहेत त्यांचे घरे पाहुन त्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेच्या यादी मध्ये समाविष्ट करण्यात यावा.
सध्या आष्टी तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला दिसुन येत आहे ?अशी लोकांची चर्चा दिसून येत आहे, सामाजिक कार्यकर्ते रूपचंद कर्डिले वेळोवेळी गोरगरिबांच्या समस्या शासन दरबारी जाऊन सोडवत असतात व त्यांच्या प्रधानमंत्री आवास घरकुल योजना काही गावांमध्ये यादी पाहिल्यानंतर त्यांच्या लक्षात आले जे गोरगरीब लाभार्थी आहेत त्यांना कच्चेघरे असून सुद्धा प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता आला नाही. तरी प्रशासनाने याच्याकडे जे गरजू लाभार्थी आहेत त्यांचे घरे पाहून त्यांना पक्के घरी देण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रूपचंद कर्डिले यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा आदेश! सर्व राज्यांतल्या पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि परत पाठवा

➤ नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधत एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. देशात असलेले पाकिस्तानी नागरिक ओळखून त्यांना परत पाठवा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत. पहलगाम (जम्मू–कश्मीर) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानविरोधात कडक भूमिका घेतली आहे. सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द ● पान ४ वर...

### मलकापूर येथे जनसेवानंद सुभाषबप्पा महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताह

● पान १ वरून... १२ ते ३ विश्रांती व ४ ते ६ हरिपाठ नेतृत्व रघुनंदन महाराज पुजारी (संत गोरोबाकाका वारकरी संस्था) यांच्याकडे राहील तसेच रात्री ६ ते ८ भोजन, ९ ते ११ कीर्तन अशी या सप्ताहाचा दिनचर्या आहे. या सप्ताहात पुढीलप्रमाणे ख्यातनाम कीर्तनकार मंडळींची कीर्तनसेवा होणार आहे यामध्ये दि.५ मे रोजी ह.भ.प.समाधान महाराज शर्मा, दि. ६ मे ह.भ.प. पोपट महाराज कासारखेडकर, दि.७ मे ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे, दि.८ मे ह.भ.प. डॉ जयवंत महाराज बोधले, दि.९ मे ह.भ.प. बाळू महाराज गिरगांवकर, दि.१० मे ह.भ.प. रामराव महाराज ढोक, दि.११ मे ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे कीर्तन व ह.भ.प.एकनाथ महाराज लोमटे यांचे काला व पुण्यतिथीनिमित्त काल्याचे कीर्तन होईल व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तसेच दि.१२ मे २०२५ रोजी सकाळी ७ ते ९ वारीचे प्रवचन व त्यानंतर पौर्णिमेची महाआरती मलकापूर येथे होईल तरी सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री दत्त संस्थान, मलकापूरचे मठाधिपती ह.भ.प. सद्गुरु एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



खरंच का मी विचार करते
आणि तु समोर येतोस,
असं कधी होतंय का?

तुझ्या विश्वासावर एवढं लिहिते
ते तुला कधी कळतंय का?
माझ्या मनाचं तर सोडून दे
तुझं मन माझ्यासाठी कधी झुरतय का?

मला कोणीतरी छान बोलेन
ते पाहून तुझं मन जळतय का?
मी खरंच खूप सुंदर आहे
असं तुला वाटतंय का?

# बोलं ना... तुला असं वाटतंय का?

कविता....

**ॲड शितल सत्वधर**



## गेवराईत सर्वधर्मीय नागरिकांची शहीदांना श्रद्धांजली

**गेवराई : शेख खाजा**




पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात निष्पाप पर्यटकांच्या झालेल्या हत्येच्या निषेधार्थ शहीदांना श्रद्धांजली अर्पण करणे करीता सर्वधर्मीय नागरीकांच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते .शास्त्रीचौक गेवराई येथे सायंकाळी ७ वाजता शहीदांना मेणबत्या लावून व पुष्पवाहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

या प्रसंगी अल्पसंख्यांक सेलचे एस . वाय . अन्सारी, मराठा क्रांती मोर्चाचे माऊली गंगाधर, सहारा अनाथालयाचे संतोष गर्जे , मनसे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, कडूदास कांबळे, कॉंग्रेसचे सय्यद सिराज अहेमद ,डॉ . उद्धव घोडके,नवीद मशायक, सुघोष मुंढे, ॲड . सुभाष निकम इत्यादींनी श्रद्धांजली पर विचार व्यक्त केले . हा हल्ला फक्त पर्यटकांवर नसून भारताच्या एकात्मतेवर आहे . तरीही कश्मीर मधील मुस्लीम बांधवांनी पर्यटकांना जीवापाड जपून व मदत करून देशाच्या एकात्मतेचे दर्शन घडवले आहे . देशात सर्वधर्मीय देशवासीयांनी आपली एकात्मता कोणत्याही संकटांना न जुमानता जाणीवपूर्वक जपली पाहिजे . आपण सर्वधर्मीय नागरीकांनी एकतेने राहणे हेच शत्रूंना खरे उत्तर राहील असे विचार या प्रसंगी व्यक्त करण्यात आले .
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते ॲड . सुभाष निकम यांनी केले . या प्रसंगी पत्रकार बांधवांसह राजेंद्र डेंगे, सतिषराव देशमुख, ॲड . कल्याण काळे, ॲड . अप्पासाहेब गरुड,ॲड . राहूल राका, प्रा . जरांगे सर ,राजेंद्र धुंबार्डे सर, सखाराम कानगुडे, हरीश निळकंठ,अनिल बोराडे, सुनिल पाटेकर, शेषेराव बोराडे, महादेव बोराडे, रहीम सेठ,अंनिस चे सतिश अत्राम सर, सूर्यवंशी सर, रोहन पंडित,नानासाहेब पवार, पत्रकार जुनेद बागवान,शोएब अत्तार, शाहेद बागवान, मोहसीन बागवान, सय्यद राफे, खैसर पटेल, शेख अशरफ, मुश्ताक राज, बारगजे सर, रामनाथ गंगाधर, गणेश कापसे , दिलीप जोशी, योगेश गाढे, ईश्वर पवार, इंजिनिअर सिराजभाई, छगन खरात,सोनकांबळे, उमाप यांचे सह पत्रकार जावेदभाई, पत्रकार काळे , पत्रकार शेख खाजा, पत्रकार इम्रान सौदागर इत्यादींसह शेकडो नागरीक उपस्थित होते .

# ...स्वभावातील नकारात्मकता वाढत जाते

आपल्यावर अन्याय झाला म्हणजे आपण स्वत : गुन्हेगार होणे योग्य नाही . जाणून घ्या गुन्हेगारांची मानसिकताआपण अनेकदा बघतो की कुटुंबात, समाजात सगळीकडेच एकमेकांवर अन्याय, अत्याचार, अपमान, छळ, चूक नसतानाही त्रास सहन करावा लागणे हे होत असते . कोणतेही घर, कोणतीही व्यक्ती, कोणताही समाज याला अपवाद नाही . हा त्रास अगदी आपल्या लहानपणापासून झालेला असतो, तर कधी अगदी आपण वयोवृद्ध होईपर्यंत इतरांच्या चुकांची शिक्षा भोगत असतो . अनेकदा आपण आपल्याला झालेला त्रास, आपल्यावर कोणीही केलेला अन्याय, अत्याचार यामुळे खूप छळ, मनस्ताप, मान हानी, आर्थिक नुकसान सहन केलेले असते . अनेकदा भलत्याच व्यक्तीच्या चुकीमुळे अनेक कुटुंब, घराणे उद्ध्वस्त झालेले असते . पुढील पिढीचे नुकसान, घरातील लोकांची भावनिक, मानसिक हानी झालेली असते .

जेव्हा आपण कोणतेही गुन्हे घडताना पाहतो, मग ते वैयक्तिक पातळीवर केलेले असोत, सामुदायिक स्वरूपात केलेले असोत, वैयक्तिक द्वेष, चीड आणि वैमानस्यातून घडलेले असोत, कोणत्याही जात, धर्म, पंत, प्रांत, पक्ष यांच्यामधील तेढ असो यामागे एकमेकांप्रति खूप खोलवर रुजलेला, खूप जुना साठून असलेला राग ठासून भरलेला असतो . आपण सगळ्यांनी अन्यायाविरुद्ध जरूर लढावे, अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा चुकीचा असतो असे आपण कायम म्हणतो . व्यक्ती कोणीही असो, कितीही सुशिक्षित असो, गरीब असो श्रीमंत असो, लहानपणापासून आपल्यावर झालेले संस्कार, आपल्याला इतरांकडून मिळालेली माहिती, आपल्याला ठासून सांगण्यात आलेले विचार, आपल्यावर बिंबलेल्या घटना मग त्या कितपत सत्य-असत्य, योग्य-अयोग्य याची शहानिशा न करता एखाद्याबद्दल आपले बनवले गेलेले मत यातूनच आपल्याला कोणाहीबद्दल प्रचंड तिरस्कार, द्वेष हा निर्माण होत असतो आणि दिवसेंदिवस तो वाढत असतो .

आपण स्वत :च्या मनाने बुद्धीने विचार करायला सक्षम झाल्यावर पण परत कोणत्या प्रकारच्या लोकांच्या संगतीत येतो, आपल्यात खुनशी वृत्ती, दुश्मनी, बदल्याची भावना, बेरडपणा, निगरगट्टपणा फोफावतो की कितीही नकारात्मक परिस्थितीमधून आपण स्वच्छ, नैतिकतेचा, चारित्र्य संपन्न मार्ग स्वीकारण्यासाठी आपल्यात आत्मविश्वास आणि वैचारिक प्रगल्भता कितपत येते यावर आपण गुन्हेगारीकडे वळणार आहोत की एक सर्वसामान्य व्यक्ती चारित्र्यवान व्यक्ती म्हणून, समाजाचा जबाबदार घटक म्हणून राहणार आहोत हे ठरते . आज समाजात फोफावत चाललेला हिंसाचार, भ्रष्टाचार, आत्महत्या, घात पात, खून, धमक्या, ब्लॅकमेलिंग, मारहाणीच्या घटना, बलात्कार, वेगवेगळ्या प्रकारची फसवणूक, आर्थिक गुन्हे का वाढत आहेत? या प्रकारे वर्तणूक करताना लोकांना कायद्याची, पोलिसांची भीती का वाटत नाही? ज्यांना आपण फसवतोय, ज्यांना त्रास देतोय तो देखील माणूस आहे, त्याला पण कुटुंब आहे, त्याला पण समाजात प्रतिष्ठा आहे . मुलं-बाळं घरदार आहे हे आपण विसरून जातो आणि फक्त आपण गुन्हा करूनही कसे निष्कलंक आहोत याचे समर्थन करत असतो . आपण ज्याला फसवतो, ज्याच्यावर अन्याय, अत्याचार, मारहाण अथवा काहीही त्रासदायक करतो तेव्हा त्या व्यक्तीला त्याच्या कुटुंबाला काय भोगावं लागतं याचा थोडाही विचार गुन्हेगार करत नाही .

स्वत :च्या मनाला, स्वत :च्या कुटुंबाला, आपण राहतो त्या समाजाला फसवताना, कुकर्म करताना गुन्हेगारीच्या वाटेवर वळताना लोकांना काहीच का वाटत नाही? या मागे त्यांची काय मानसिकता असते? गुन्हेगार तयार होण्यामागील सायकोलॉजिकल कारण काय यावर आपण जाणून घेऊयात . सोसोओपॅथी आणि सायकोपॅथी हे दोन घटक ठरवतात की एखादी व्यक्ती गुन्हेगारीकडे वळेल की नाही? या दोन प्रवृत्ती आपल्यामध्ये किती प्रमाणात आहेत या ठरवण्याचं कामं आपल्या मानसिकतेमधील काही मूलभूत घटक ठरवतात . कितपत आणि कितीवेळा एखादी व्यक्ती कोणत्या स्वरूपाचा गुन्हा करण्याची मानसिकता ठेवते हे त्याच्या मानस शास्त्रावरच अवलंबून असते . नार्सिसिजम ( आत्म प्रीती वाद ) Machiavellianism ( उपपती )saradin froid ( विवादास्पद ) आणि sadism ( दुसऱ्याच चांगला झालेला पाहून आनंद होणे ) या चार वृत्ती



आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये किती प्रमाणात आहेत यावरून आपल्यात कुठली मानसिकता जास्त घर करू शकते हे ठरते . आपल्याला आपल्या घरात, ओळखीत, समाजात कुठेही या वृत्तीची तीव्रता असलेले लोक असतील तर आपण त्यांना वेळीच आवरणे, सावरणे आवश्यक आहे . अशा व्यक्तीच्या छोट्या छोट्या वागणुकीतून, स्वभावातून, त्यांच्या जीवनात ते काय करतात, कसे जगतात त्यांनी सर्व प्रथम छोट्यातला छोटा अन्याय कोणावर केला? सर्वात पहिली फसवणूक कोणाची केली? हिंसाचार कुठे केला, कोणासोबत केला हे विचारात घेणे आवश्यक आहे .


दुर्दैवाने गुन्हेगारांचे समुपदेशन करताना खूपदा हेच लक्षात येते की, त्यांच्या अशा वृत्तीची सुरुवात त्यांच्या घरातूनच त्यांनी केलेली असते, दाखवलेली असते . त्यावेळी त्याकडे दुर्लक्ष केल्याने, त्याची बाजू सावरल्याने, त्याला पाठीशी घातल्याने किंवा भावनिक होऊन त्याचा विचार केल्याने पुढे हीच व्यक्ती घराबाहेर पण आपला तोच स्वभाव, तीच शैली, तोच खोटेपणा, लबाडी वापरून समाजात गुन्हे करताना आणि समाजाला उद्ध्वस्त करताना दिसते . अनेकदा असे पाहायला मिळते की, ज्या व्यक्तीमध्ये हे वरील घटक जास्त असतात त्या व्यक्ती गुन्हेगारी वृत्तीकडे वळण्याची शक्यता अधिक असते . बालपणी पालकांकडून झालेले दुर्लक्ष, लहानपणी सहन करावी लागलेली शारीरिक, भावनिक, मानसिक पिळवणूक, योग्य संस्कार न् मिळणे, बालपणी खूप अत्याचार, अन्याय, अपमानित होणे अशा गोष्टी घडल्या असतील तरी ही मुलं मोठी होऊन गुन्ह्यात पटकन ओढली जातात . झटपट पैसा मिळवणे, कष्ट करण्याची तयारी नसणे, खोटा मोठेपणा, रुबाब, श्रीमंती याच्या चुकीच्या कल्पना डोक्यात असणे या गोष्टी पुढे जावून कोणाच्याही मानसिकतेवर नकारात्मक परिणाम करत असतात . अनेकदा अशा व्यक्तिमत्त्वामध्ये, त्याच्या स्वभावात recidivism नावाचा घटक असतो . ज्यामुळे एकदा गुन्हा करून, त्यात पकडले जावून, त्याची शिक्षा भोगून देखील परत परत तोच गुन्हा करण्याची वृत्ती त्या व्यक्तीमध्ये निर्माण झालेली असते . यामुळे स्वत :ला बदलून चांगल्या मार्गावर आणण्याची वृत्ती नाहीशी होते आणि स्वभावातील नकारात्मकता वाढत जाते .

सर्वसामान्य व्यक्तीला वाटते एखादा चोरी, घरफोडी करून तुरुंगात राहून आला, आता तो सुधारणार, त्याला पच्छाताप होईल, तो झालेल्या शिक्षेमुळे बदलेल पण दुर्दैवाने तसे न् होता भविष्यात तो अधिक मोठ्या चोऱ्या करू लागतो . एकदा तुरुंगात जावून आल्यावर पण त्याची मानसिकता का बदलत नाही? तर तिथे तो अनेक प्रकारच्या गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना भेटतो, तिथे त्याला गुन्हेगारी क्षेत्रामधील अधिक माहिती आणि ज्ञान मिळते . जास्तीत जास्त काय होतं, कायदा कसा कामं करतो, जामीन कसा मिळतो हे अट्टल गुन्हेगार पूर्ण अभ्यासून असतो . त्यातून तुरुंगातील संगत त्याचा आत्मविश्वास, बेरडपणा वाढवून त्याची नजर मरते, भीड चेपते .

खूप क्वचित असे होते की, एकदा एका गुन्ह्यात शिक्षा भोगल्यावर ती व्यक्ती फिरून आयुष्यात परत चुकीच्या मार्गाला जात नाही . अन्यथा एक गुन्हा केला काय आणि दहा वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे केले तर काय कलम बदलतील, शिक्षेचा कालावधी बदलेल पण आपला हेतू तर साध्य होईल, आपल्याला जे हवं ते मिळवता येईल, जे करायचं ते करता येईल अशी भूमिका तयार होते . पकडले जाऊ तेव्हा बघता येईल तोपर्यंत तरी मनाप्रमाणे जगून घेऊ, कायद्याच्या पळवाटा शिकून घेऊ . गुन्हेगारी वृत्ती असलेल्या लोकांचे आदर्श पण त्याच क्षेत्रातले किंवा त्या सारखेच गुन्हे केलेले इतर लोक असतात . समुपदेशन दरम्यान लक्षात येते की, दुसऱ्या आपल्यापेक्षा मोठ्या, कुविख्यात अथवा प्रतिष्ठित पण ज्याने गुन्हा करून तो त्यातून सहीसलामत सुटला, त्याचं कोणीच काही बिघडवू शकलं नाही, त्याला शिक्षा झाली नाही, कमी शिक्षा झाली अथवा सगळीकडेच असे गुन्हे घडतात, खूप लोकं असंच करतात या प्रकारचे समर्थन गुन्हेगार देताना दिसतात . ज्यांनी मोठे मोठे गुन्हे केले, जे त्यामुळे खूप प्रसिद्धीच्या झोतात आले किंवा ज्यांच्या भोवती खूप वलंय आहे, ज्यांचं गुन्हेगारी क्षेत्रात नाव आहे, ज्यांना सगळे घाबरतात, ज्यांची दहशत आहे असे लोकं नव्याने उदयाला येणाऱ्या गुन्हेगारांना खूप प्रेरणादायी वाटतात . आदर्शच चुकीचे असल्यामुळे त्यांना आपण पण काहीही करून त्यातून बाहेर पडू शकतो, हा चुकीचा, आत्मविश्वास निर्माण होतो आणि कायदा-सुव्यवस्था फाट्यावर मारण्याची त्यांची वृत्ती फोफावली जाते . यामुळे एकदा गुन्हा करून त्याचे परिणाम भोगून पण व्यक्ती परत परत ती गोष्ट करत राहते आणि कालांतराने आपण जे करतोय ते चुकीचं आहे, बेकायदेशीर आहे, हानिकारक आहे, अनैतिक आहे ही जाणीव नाहीशी होत जाते .

याबरोबरच मागील लेखात सांगितल्याप्रमाणे जर अशा गुन्हेगारांना पाठीशी घालणारे लोकं त्यांच्या आजूबाजूला अथवा संपर्कात असतील तर त्यांना घरातही धाक राहत नाही आणि आपण काही चुकीचं करतोय हा विचार पण त्यांना येत नाही . तरी आपण सगळ्यांनी हेच लक्षात घेतलं पाहिजे आपण कोणाच्याही गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालत नाही न्? आपल्याला त्यातून काही फायदा होतोय म्हणून स्वार्थी भावनेने आपण एखादा गुन्हेगार घडवत नाही न्? याचबरोबर आपला वापर कोणी कोणतेही प्रलोभण दाखवून चुकीच्या कामासाठी करत नाही न्, पावलोपावली आपण जे करतोय ते नीतिमत्ता आणि कायदा याला धरून आहे का हे पडताळून घेणे एक सुजाण नागरिक म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहे .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळ्लाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष

## मिलन नाईट नावाच्या मटका जुगारांवर माजलगांव शहर पोलीसांचा छापा



माजलगाव / प्रतिनिधी : गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील इंदिरानगर परीसरातील रोशन किराणा दुकानासमोर दि २३ रोजी रात्री ९ वा. सुमारास छापा मारुन मिलन नाईट नावाचा मटका खेळवणारा बाबु भिमा डुकरे रा. इंदिरानगर माजलगांव यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन नगदी रुपये, व जुगाराचे साहीत्य असा एकुण ३३३०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मटका जुगार खेळवणारा बाबु भीमा डुकरे रा. इंदिरानगर तसेच बुकी मालक इर्शाद शेख रा. माजलगांव यांच्या विरुध्द गु.र.नं. १६१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, कमलेश मिना सहा. पोलीस अधीक्षक उपविभाग केज अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड, पोहेकॉ माधव तोटेवाड, पोलीस अमलदार लखन गंगावणे, सुनिल गवळी यांनी केली आहे.

## पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गौरी कांबळे चे यश



माजलगाव / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी गौरी नवनाथ कांबळे हिने यश संपादन केले असून ती या शिष्यवृत्तीस पात्र झाली आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील अभिनव पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार नवनाथ कांबळे यांची मुलगी गौरी कांबळे हिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे. तिच्या या यशाबद्दल अभिनव पब्लिक स्कूलमधील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच परिसरातून तिचे कौतुक होत आहे.



## मुलानी वाडगाव येथे पहलगाम हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली

पैठण : सर्जेराव खडसन

पैठण तालुक्यातील मुलानी वाडगाव/जोगेश्वरी ग्रुप ग्रा.प. च्या वतीने जम्मु काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शहिदांना ग्राम पंचायत कार्यालय व गावकऱ्यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करुन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी सरपंच वंदना अनिल लांडगे, उपसरपंच सतीश शेळके, राजू मिसाळ, अश्विनी किशोर शिरवत, पद्माबाई दगडू शेळके, शांताबाई बाबुराव तित्तर, बानोबी अफसर सय्यद, साधना बद्रिनाथ जाधव ग्राम पंचायत अधिकारी बी.बी.गव्हाणे, ग्रा.पं.कर्मचारी विजय शिंदे, योगेश शिरवत यांच्यासह अंगणवाडी सेविका मीरा औटे, आशा मोगल, रजनी गुरव, गीता कळसकर, आशा सेविका इत्यादींची उपस्थिती होती.

## सर्व राज्यांतल्या पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि परत पाठवा

● पान २ वरून... करण्यात आले असून, अधिकृत कागदपत्र असलेल्यांना १ मे पर्यंत आणि सार्क व्हिसाधारकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले गेले आहेत. अमित शाहांनी साधला सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद...पहलगाम (जम्मू-कश्मीर) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानविरोधात कडक भूमिका घेतली आहे. सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, अधिकृत कागदपत्र असलेल्यांना १ मे पर्यंत आणि सार्क व्हिसाधारकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले गेले आहेत.

# आणखी एका क्रेडीट सोयायटीत घोटाळा, लेखापरीक्षकासह 24 जणांवर गुन्हा


### फेर लेखापरीक्षण अहवालावरून गुन्हा दाखल

माजलगाव / प्रतिनिधी : संस्थेत जमा झालेल्या ठेवीच्या नोंदी व कर्ज रकमेच्या नोंदी संगणकावर न करता बनावट दस्तऐवज करून ठेवीदारांना ठेऊन पावत्या व कर्जदारांना बेबाकी प्रमाणपत्र दिल्या. या प्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे संचालक मंडळ व कर्मचारी, धनदांडगे मालमत्ता खरीददार व या सोसायटीच्या लेखापरीक्षकासह २४ जणांवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात लेखापरीक्षा वर्ग २ त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





या अपहारास जबाबदार असलेल्या २४ जणांबाबत तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष सतीश गंगाधर सावंत, गणेश त्रिंबकराव शेळके, महिंद्र मनमोहन मानधने, विश्वंभर पांडुरंग



धनराज बंब

शिंदे, शिवाजी लक्ष्मण गडदे, अनिता पृथ्वीराज होके, सुनिता भास्करराव खटले, सुमित बाळकृष्ण भावसार, योगेश एकनाथ घुले, पोपट शिवाजी आवाड (वरील सर्व संचालक), मुख्य कार्यकारी अधिकारी किशोरी सतीश सावंत व गजानन विठ्ठलराव डासाळकर, व्यवस्थापक अमोल सुखदेव अंधारे, रविकिरण मधुकर दहिवाळ, भाग्यश्री गगानन डासाळकर, गुलाबाई रूपाजी अंधारे, अंजली अमोल अंधारे, अशोक आता गिरी (वरील सर्व संस्थेचे कर्जदार), लेखापरीक्षक एस.बी. गायकवाड व किरण कमलाकर सावजी, समर्थ मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी लि. माजलगाव या संस्थेचे संचालक मंडळ यांचा समावेश आहे.

माजलगाव येथील धनदांडगे व होलसेल व्यापारी धनराज प्रेमराज बंब व विजयराज हेमराज बंब या दोघांनी जिल्हा बीड संस्थेत तारण असलेली मालमत्ता बनावट दस्ताऐवजा आधारे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संगनमत करून संस्थेच्या अनेक मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले. त्यावरून या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### सोसायटीचे फेर लेखापरीक्षण केले

● माजलगाव शहरातील मोंढा भागात असलेल्या मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरीक्षण विशेष लेखा परीक्षक वर्ग २ सहकारी संस्थेचे सतीश काकासाहेब पोकळे यांनी केले. त्यांनी याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला.

● या अहवालात असे नमुद केले आहे की, समृद्ध मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी या नावाने कॅश क्रेडिट ९ कोटी ३९ लाख ७० हजार ८२१ मुदत ठेवीं मधील अपहार श्रीराम मच्छिंद्र बहिर ६ लाख, सुहास संपत जाधवर ३० लाख, कर्ज वितरणातील अपहार व गैरव्यवहार ५ कोटी ५०लाख रूपये केला. असा सर्व मिळुन १५ कोटी २५ लाख ७० हजार ८२१ रूपयांचा समावेश आहे.

## ग्रामविकास अधिकारी पंडित ढगे यांचा आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्काराने सन्मान

माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील घळाटवाडी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी पंडित मरीबा ढगे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

येथील पंचायत समिती अंतर्गत ग्रामविकास अधिकारी म्हणून मागिल अनेक दिवसापासून पंडित ढगे हे कार्यरत आहेत.

सर्वसामान्य लोकांच्या कामांना ते प्राधान्य देतात त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या वतीने ग्रामविकास अधिकारी पंडित मरीबा ढगे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे सरपंच संगिता येताळ, उपसरपंच अनुपभाऊ घाडगे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, घळाटवाडी ग्रामस्थ व सर्व मित्रपरिवार व नातेवाईकातून अभिनंदन होत आहे.



## १६ व्या शिवार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पडलवार, स्वागताध्यक्षपदी भारत होके

माजलगाव : मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने १६ व्या शिवार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ना.मा. पडलवार तर स्वागताध्यक्षपदी भारत होके यांची निवड करण्यात आली.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने दरवर्षी शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन शेतात करण्यात येते. यापूर्वी मंजरथ (धाकटे), नाखलगाव, फुले पिंपळगाव, दिंद्रुड, सादोळा, मंजरथ, रोशनपुरी, नित्रूड, पात्रूड, भाटवडगाव, मालीपारगाव या ठिकाणी शिवार साहित्य संमेलन घेण्यात आले. यावर्षीचे सोळावे शिवार साहित्य संमेलन





माजलगाव येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात होत आहे. संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार यांचे 'मी ही बोलणार' हा भाषण संग्रह, विषारी पैसा, कन्यारत्न, बाई बाटली अन् जुगार या एकांकिका प्रकाशित आहेत. त्यांचा 'माझी आवड' हा बालकविता संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. स्वागताध्यक्ष भारत होके हे माजी नगरसेवक असून सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असतात. यावेळी आयोजित बैठकीला मसाप शाखेचे अध्यक्ष मुकुंदराव सोळंके, उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक, कार्यवाह प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर, सहकार्यवाह बालासाहेब झोडगे. प्रा. डॉ. उमेश साडेगावकर यांची उपस्थिती होती.

## अवैध वाळुची वाहतुक करणारा ट्रॅक्टर जप्त

माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील ईरला मजरा येथील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची वाहतुक करणारा ट्रॅक्टर माजलगाव ग्रामिण पोलीस पथक गस्तीवर असताना आढळुन आल्याने तो जप्त करुन संबंधित आरोपी नामे योगेश काटवटे याला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे.



श्री, उद्धव राऊत, पोलीस ह. ग्रामीण पोलीस ठाणे




प्रकरणी पोह उद्धव मदनराव राऊत यांनी ग्रामिण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन त्यांच्या सह पोलीस पथक २३ एप्रिल बुधबार रोजी च्या पहाटे ४ वा च्या सुमारास ईरला मजरा गाव नजीक गस्तीवर असताना त्या गावाच्या शिवारातील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची महिंद्रा अर्जुन अलट्रा ५५५, विना नंबर हेड, ट्रॉली मधुन आरोपी योगेश आसाराम काटवटे वाहतुक करत असल्याचे आढळून आल्याने ट्रॅक्टर जप्त करुन नमुद आरोपी विरोधात भान्यासं कलम ३०३ सह मोटार वाहन अधिनियम कायद्याच्या कलम ५०/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव तहसीलदार माजलगाव यांच्या कडे सादर केला असल्याच सांगितले जाते. या ठिकाणाहून मागच्या अनेक वर्षांपासून अवैद्य रेती उपसा होत आहे सर्वश्रुत आहे या कार्यवाहिने नक्कीच चपराक बसणार आहे.


## लाईट सुरू करण्यास गेलेल्या ऑपरेटर ला शॉक गंभीर ऑपरेटर वर छ संभाजीनगर येथे उपचार सुरू

माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील तालखेड फिटर ला ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या ऑपरेटर ला बंद असलेली लाईट सुरू करताना जबरदस्त शॉक लागल्याने ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्या वर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे

या विषयी समजलेली माहिती अशी की, तालुक्यातील तालखेड फिटर येथे मागील पाच सहा वर्षा पासून ऑपरेटर म्हणून काम करणारे पवन भिमराव जावळे अंदाजे वय २६ रा पाचेगाव ता आष्टी येथील रहिवासी असून ते नेहमी प्रमाणे ते दि २४ रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आपल्या कामावर हजर होते काही भागातील लाईट बंद असल्याने त्यांनी ती सुरु करण्यासाठी असता त्यांना त्या ठिकाणी अचानक



उपचार घेताना



पवन जावळे, ऑपरेटर

जोराचा शॉक बसल्याने त्यांच्या मगणक्याला मार लागून, छातीवर, हातावर व चेहऱ्यावर जबर भाजले आहे ही घटना काही लोकांना समजल्याने त्यांनी पवन जावळे यांना बघितले आनी तात्काळ माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्यांची जखम मोठी असल्याने त्यांना त्याच दिवशी सायंकाळी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले असल्याचे गावातील नागरिक सांगत आहेत.

# जिवंत सातबारा मोहीम जलद गतीने राबविणे : अनिल बोर्ड

गेवराई : प्रतिनिधी

राज्य शासनाने महसूल विभागाचे दस्तावेज असलेल्या सातबारा उताऱ्यावरील सर्व मयत खातेदाराच्या अद्यावत करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत त्याबाबत गेवराई तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मंडळ निरीक्षक व तलाठी यांना निर्देश देण्यात यावेत अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा गेवराई मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी गेवराई तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार संजयजी सोनवणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली आहे.

जिवंत सातबारा मोहीम जलद गतीने गति मानतेने राबविण्याबाबत राज्य शासनाने महसूल विभागाचे दस्तऐवज असलेल्या सातबारा उताऱ्यावरील सर्व मयत खातेदाराच्या अद्यावत करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश शासनाने दिलेले आहेत. तशी घोषणा अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आलेली आहे. याबाबत शासनाने या मोहीम साठी कृती कार्यक्रम केला असून त्यासाठी 1 एप्रिल ते 10 मे 2025 या कालावधीत जिवंत सातबारा मोहिमे अंतर्गत वारसाच्या नोंदी सातबारा वर घेण्यासाठी गतिमानतीने काम करणे आवश्यक आहे त्यासाठी तहसील कार्यालयाने मंडळ निरीक्षक व तलाठी यांची बैठक घेऊन संबंधितांना निर्देश देणे आवश्यक आहे त्याशिवाय या मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीपणे होणार नाही या साठी मोहीम राबविणे आवश्यक आहे. या मोहिमेची व्यापक अंमलबजावणी करतानाच यासाठी नागरिकांना किमान वेळ खर्च होऊन प्रक्रिया पूर्ण झाली तर ही मोहीम यशस्वीरित्या होईल. यासाठी महसूल विभागाने जनजागृती करून वरील योजना प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

सदरील शासनाची मोहीम सर्व नागरिकांच्या हिताची आहे. ही मोहीम यशस्वी झाल्यास विविध फायदे असणार आहेत. खरेदी-विक्री व्यवहाराची सर्व अडथळे दूर होतील, शेती विषयक कर्ज सोपे होतील, अधिकृत नोंदणी सातबारा वर असेल, माहिती हक्क, यासाठी आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त मंडळ निरीक्षक व तलाठी यांना योग्य त्या सूचना बैठकीत देण्यात याव्यात व या मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे व गेवराई ग्राहक पंचायत चे अध्यक्ष प्रा. भानुदास फलके यांनी निवेदनाद्वारे केलेली आहे.



लाखो भाविकांची लागणार हजेरी

राज्यभरातून येणार हजारो नामवंत कीर्तनकार, गायनाचार्य, वादक मंडळी

# इंगळे महाराज परमार्थ आश्रमात 30 एप्रिलपासून भक्तीचा महासागर

वडवणी : महाराष्ट्रात आपल्या विशेष विनोदी शैलीने गाजलेले कीर्तनकार वै. संत बाबासाहेब महाराज इंगळे यांच्या निधनाला चार वर्ष पूर्ण होत आहेत. अक्षय तृतीयेच्या दिवशीच ज्यांचा जन्म झाला होता आणि मृत्यू देखील याच तिथीला झाल्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीला विशेष महत्त्व आहे. यांच्या पुण्यतिथीनिमित्त चिंचवडगाव येथील संत इंगळे महाराज परमार्थ आश्रमामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताह सोहळ्यासाठी राज्यातील ख्यातनाम कथा प्रवक्ते विलास देवा जोशी शिवपुराण कथा सांगणार आहेत. तर राज्यातील नामवंत कीर्तनकार या ठिकाणी आपली पूर्ण वेळ देऊन कीर्तन सेवा करणार आहेत. त्यामुळे या अखंड हरिनाम सप्ताहाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाची जय्यत तयारी झाली असून सुमारे दहा एकर जागेमध्ये मंडपाची उभारणी करण्यात आली आहे. या सप्ताहासाठी राज्यभरातून आलेल्या भाविकांचे वडवणी तालुक्यातील हजारो भाविक नियोजनासाठी थांबणार आहेत या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे



आवाहन संत बाबासाहेब महाराज इंगळे यांचे चिरंजीव श्री सोपानकाका महाराज इंगळे यांनी केले आहे.

वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथे बाबासाहेब महाराज इंगळे यांनी परमार्थ आश्रमाची स्थापना केलेली आहे. धार्मिक क्षेत्रांमध्ये खूप मोठे कार्य केले आहे. बाबासाहेब महाराज इंगळे हे आपल्या विनोदी कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि इतर राज्यातही प्रसिद्ध झाले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घराघरात त्यांना भाविक ओळखत होते. विविध चॅनलवर त्यांचे किर्तन दररोज ऐकायला मिळत होते. महाराष्ट्रातील कोट्यवधी भाविक संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा विशेष भक्तगण तयार झाला होता. गेल्यावर्षी कोरोणाच्या महामारीत अक्षय तृतीया च्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. परंतु त्यांचे अंतिम दर्शन भाविकांना घेता आले नव्हते. यावर्षी अक्षय तृतीयेच्या दिवशी त्यांची पुण्यतिथी आहे. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवपुराण कथा आयोजित केली आहे. महाराष्ट्रात गाजलेले कथाकार विलास देवा जोशी यांच्या वाणीतून आठ दिवस शिवपुराण कथा ऐकायला मिळणार आहे. तर महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची दररोज संध्याकाळी किर्तन ऐकायला मिळणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो कीर्तनकार, गायनाचार्य, वादनाचार्य या सप्ताह सोहळ्यामध्ये आपली वेळ देणार आहेत. या सप्ताह सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन संत इंगळे महाराज यांचे चिरंजीव सोपान काका महाराज आणि चिंचवडगाव पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली आहे.

#### नामवंत कीर्तनकारांची कीर्तने

● या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकार हजेरी लावणार आहेत. बुधवार दि. ३० एप्रिल रोजीपासुन अनुक्रमे ह भ प भगवान महाराज इसादकर, ह भ प रामायणाचार्य पांडुरंग महाराज उगले, ह भ प प्रकाश महाराज साठे, हभप. सोपान महाराज सानप शास्त्री, कीर्तन केसरी पांडुरंग महाराज गिरी नाशिक, अक्रुर महाराज साखरे, बाळु महाराज गिरगावकर यांची कीर्तने रात्री आठ ते दहा या वेळेत दररोज होणार आहेत तर बुधवार दिनांक ५ मे रोजी सकाळी नऊ वाजता ह. भ. प. सोपान काका महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

#### जन्म ते मृत्यू अक्षय तृतीया

● संत बाबासाहेब महाराज इंगळे यांचा जन्म अक्षयतृतीयाला झाला त्यांनी इंगळे महाराज परमार्थ आश्रमाची स्थापना अक्षयतृतीयेला केली. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या मंदिराचे कळसारोहन कार्यक्रम अक्षयतृतीयेला केला आणि त्यांचा मृत्यू देखील अक्षयेलाच झाला या सर्व योगाच्या गोष्टी अक्षयतृतीयेला घडल्या असल्यामुळे त्यांच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम देखील अक्षरतृतीयेलाच करण्यात आलेला आहे.

### भव्य नियोजन

हा सप्ताह सोहळा यशस्वी करण्यासाठी परमार्थ आश्रमाच्या वतीने चांगले नियोजन करण्यात आले आहे. सुमारे दहा एकर जागेत भव्य मंडप उभारण्यात आला आहे भोजनाची स्वतंत्र दोन एकर जागेत व्यवस्था करण्यात आली आहे पार्किंग साठी दहा एकर जागेमध्ये दोन्ही बाजूला व्यवस्था करण्यात आली आहे. पाण्याची व्यवस्था तसेच सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून भाविकांना जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.